# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ ,
## नागपूर विभागीय शिक्षण मंडळ,नागपूर

दूरध्वी क्रमांक ;EPBX 0712-2565403 /2560209 /2553401 /2553360 FAX NO.0712-2561775

मेल—msboardnagpur@gmail.com


पत्र कंमाक /नाविमं /परीक्षा/2237
नागपूर दि. 17/08/2021

प्रति,

मुख्याध्यापक/प्राचार्य
सर्व मान्यता प्राप्त कनिष्ठ महाविद्यालय,
नागपूर विभाग नागपूर.

विषय : – उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा सन 2021 च्या गुणपत्रिका, अभिलेख, योग्यता प्रमाणपत्र व इतर साहित्य वितरण करणेबाबत.

संदर्भ : – राज्य मंडळ पुणे यांचे पत्र क. रा.मं./परीक्षा–2/4680 दिनांक 17/08/2021.

उपरोक्त विषयास अनुसरून आपणांस कळविण्यात येते की, सन 2021 च्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. 12 वी) परीक्षेच्या गुणपत्रिका, अभिलेख, योग्यता प्रमाणपत्र व इतर साहित्य सर्व जिल्हा निहाय संकलन केंद्रावर प्रचलित पध्दतीने **शुकवार दिनांक 20/08/2021 रोजी सकाळी 11.00 ते दुपारी 5.00** या वेळेत स्विकारण्यासाठी सर्व कनिष्ठ महाविद्यालयाचे प्रतिनिधींनी अधिकार पत्रासह उपस्थित राहावे.

**सन 2021 उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. 12 वी) परीक्षेकरिता आपणांस वितरीत करण्यात आलेले प्रात्यक्षिक साहीत्य/OMR गुणपत्रिका, श्रेणी तक्ते दिनांक 20/08/2021 रोजी संकलन केंद्रावर मंडळ प्रतिनिधींकडे जमा करण्यात यावे.**

दिनांक 21/08/2021 रोजी दुपारी 3.00 वाजता संबंधित उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांना त्यांचे गरजेनुसार व सोईनुसार शासनाच्या व आरोग्य विभागाच्या सर्व नियमांचे व सूचनांचे पालन करून गुणपत्रक वितरण करावे. याबाबत सर्व उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांना विशिष्ट तारखेला गुणपत्रक घेवून जाणेबाबत आग्रह धरू नये. तसेच उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महविद्यालयांमध्ये पालक/विद्यार्थी यांची एकाच वेळी गर्दी होणार नाही, याची दक्षता घेवून नियोजन करावे.

(श्रीराम चव्हाण)
विभागीय सहसचिव,
नागपूर विभागीय मंडळ, नागपूर

प्रतिलिपीः–

1) सचिव, राज्य मंडळ, पुणे यांना संदर्भिय पत्राचे अनुषंगाने माहितीस्तव समादराने अग्रेषित.
2) शिक्षण उपसंचालक, नागपूर विभाग नागपूर यांना माहितीस्तव व उचित कार्यवाहीस्तव समादराने अग्रेषित.
3) शिक्षणाधिकारी (माध्य). जिल्हा परिषद,(भंडारा,चंद्रपूर,नागपूर,वर्धा,गडचिरोली,गोंदिया) यांना माहितीस्तव व उपरोक्त बाब सर्व संबंधितांचे लेखी निदर्शनास आणुन देण्याच्या अनुषंगाने कार्यवाहीस्तव.